# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 28/07/2021 (बुधवार)

(सायंकाळ)

---

**अपघातात मृत्यू**

1) पो.स्टे. बोरी :– दिनांक 16/07/2021 चे 17:00 वा. दरम्यान मृतक/आरोपी नामे– मंगेश मनोहरराव चित्रीव, वय 36 वर्ष, रा. शेषनगर नागपुर हे आपली एमएच– 49/ एन– 8909 कमांकाच्या मोटारसायकलने नागपुर वरून वर्धा येथे पत्नी व मुलीसह जात होते. त्यादरम्यान त्यांच्या ताब्यातील मोटारसायकल हे सातगाव टर्नींग जवळ भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असतांना रोडवर आलेल्या गायीला धडक मारल्याने मोटारसायकल रोडवर पडुन मंगेश चित्रीव हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारकरीता मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता दि. 21/07/2021 रोजी त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– देवानंद मनोहरराव चित्रीव, वय 36 वर्ष, रा. शेषनगर नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी भारती पोस्टे बुटीबोरी मो. क्र. 9850974033 हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– दिनांक 26/07/2021 चे 12:30 वा. ते 13.00 वा. दरम्यान अशोक सोमाजी पौनीकर (मृतक), वय 48 वर्ष, रा. इतवारीपेठ उमरेड हा त्याची एमएम– 40/बीएक्स– 1075 कमांकाच्या मोटरसायकलने सोबत मित्र राजेश त्रिपाठी, वय 48 वर्ष, रा. ओमनगर मंदीर उमरेड यांच्यासह पुजेचा सामान आणणेकामी भिवापुर कडे जात होते. त्यादरम्यान भिवापुर कडुन आरोपी नामे– विशाल शेषराव हत्तीमारे, वय 25 वर्ष, रा. जोगीठाणा पेठ, उमरेड हा त्याच्या एमएच– 40/एएफ– 7252 कमांकाच्या मोटरसायकलनी त्याचे सहकार्यासह येत असता ट्रकला ओव्हरटेक करून भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन यातील एमएम– 40/बीएक्स– 1075 कमांकाच्या मोटरसायकला समोरून धडक दिली. या अपघातात अशोक पौनीकर व त्याचा मित्र खाली जखमी अवस्थेत पडले व उपचारादरम्यान अशोक पौनीकर याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा आनंद धात्रक पोस्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री डोर्लीकर मो.नं. 8767254501 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर